**महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक**

**<u>नोंदणी क्रमांक पी.एन./जी.एन.एल(ए) १ दिनांक २२ मार्च १९७२</u>**

---

# सन २००९-२०१० आधारभुत खरेदी योजने अंतर्गत खरीदलेल्या धानाची भरडाई व धान / तांदुळ वाहतुकीसाठी संमतीपत्र

---

संमतीपत्र (अटी /शर्तीसह) विक्री किंमत रुपये १०००/-

संमतीपत्र प्राप्त करण्याचा कालावधी दिनांक १८/११/२००९ ते ३०/११/२००९रोजी

(सुट्टया वगळुन कार्यालयीन वेळेत)

संमतीपत्र अटी /शर्तीसह सादर करण्याची अंतिम तारीख वेळ

दिनांक ३०/११/२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता

---

✶**रजि. ऑफीस** ⇨" आदिवासी विकास भवन ", २ रा राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२.

☎ दुरध्वनी ⇨ २५७१७८२, २५७६८६० फॅक्स⇨ (०२५३) २५७१५६०. . तार ⇨ट्रायबलकॉर्प

**Web**-www.mahatdc.com, **Mail-** msctdcnsk@sancharnet.in

दिनांक:-  /  /२००९

प्रति,

मा.व्यवस्थापकीय संचालक,

महा.राज्य सह.आदि.विकास महामंडळ मर्या,

आदिवासी विकास भवन, २ रा मजला,

जुना बॉम्बे आग्रारोड, नाशिक ४२२ ००२

विषय :- आधारभुत किंमत खरेदी योजना २००९-१० मधे खरीदलेला धान वाहतुक करणे, भरडाई करणे व तांदुळ वाहतुकीसाठी संमतीपत्र सादर करण्या बाबत.

संदर्भ :- आपले कार्यालयाने प्रसिध्द केलेल्या दैनिक महाराष्ट्र टाईम्स / दैनिक नवभारत मधील जाहिर सुचना दिनांक  नोव्हेंबर २००९

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी / आम्ही आपले प्रादेशिक कार्यालय ------------ अंतर्गत -------------- <u>जिल्ह्यासाठी</u> विषयांकीत योजने अंतर्गत खरीदलेला धान वाहतुक करुन भरडाईअंती प्राप्त कच्चा तांदुळ शासन जमा करण्यास इच्छुक आहेत /आहोत.

आमच्या धान भरडाई मिलच्या व मशिनरी बाबत माहिती सोबत जोडली असून आपले अटी शर्ती नुसार खालील प्रमाणे कागदपत्र सोबत जोडले आहेत.

१) मागील शासकीय कामाचा अनुभवाचा दाखला जोडला आहे / नाही.
२) मागील वर्षाचे आर्थिक उलाढालीसंबंधी सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र जोडले आहे / नाही
३) अदयावत विज बिल भरणा केल्याचे पावती झेरॉक्स प्रत जोडले आहे / नाही.
४) भरडाई क्षमता (दरताशी) प्रमाणपत्र जोडले आहे / नाही
५) मिलकडे असलेली धान साठवणुक क्षमता संबंधीचे प्रमाणपत्र जोडले आहे / नाही.
६) आयकर /विक्रीकर संबंधीचे प्रमाणपत्र जोडले आहे / नाही.
७) रुपये ५०,०००/- चे डि.डि. जोडले आहे / नाही
८) रुपये १,०००/- चे डि.डि. जोडले आहे / नाही (संमतीपत्रे वेबसाईडवरुन घेतले असल्यास )

याव्यतिरिक्त सोबत दिलेले १ ते ४३ पर्यंतच्या अटी शर्ती वाचलेल्या असून मला / आम्हाला मान्य आहेत. सबब विनाअट समतीपत्र देत आहे / आहोत. कृपया भरडाईचे काम मिळावे ही विनंती.

आपला

**सहपत्र :- वरील प्रमाणे दाखले (   )**

(भरडाई मिलचे नांव /पत्ता )

(सही व शिक्का)

GANESH\TDC-PSS.DOC

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक - ४२२ ००२.
रजि. ऑफीस " आदिवासी विकास भवन ", २ रा राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२.
दुरध्वनी २५७५८९३, २५७१७८२ फॅक्स (०२५३) २५७१५६०. . तार ट्रायबलकॉर्प
**Web**-www.mahatdc.com, **Mail**- msctdcnsk@sancharnet.in

**हंगाम २००९-२०१०**

**आधारभूत खरेदी भाताची भरडाई व धान / तांदुळ वाहतुकीसाठी मुळ संमतीपत्र**

(जिल्हा. . . . . . . . . . . . . . . . . . . साठी )

| | | |
|---|---|---|
| १) | फॉर्म नंबर | :- |
| २) | संमतीपत्र भरणारा मिलधारकाचे नांव व पुर्ण पत्ता(दुरध्वनी ,भ्रमणध्वनी क्रमांकासह) | :------------------------------------------------ |
| | | ------------------------------------------------- |
| | | :------------------------------------------------ |
| | | :------------------------------------------------ |
| ३) | भरडाई मिलचे नांव व संपूर्ण पत्ता दुरध्वनी क्रमांक | :------------------------------------------------ |
| | | :------------------------------------------------ |
| | | :------------------------------------------------ |
| ४) | भरडाई मिलचे मालक भागीदार/ सहकारी संस्थाचे नांव व संपूर्ण पत्ता | :------------------------------------------------ |
| | | :------------------------------------------------ |
| ५) | भरडाई मिलची भरडाई क्षमता दर ताशी (सोबत पुरावा द्यावा) | :------------------------------------------------ |
| ६) | भरडाई मिलकडे असलेली साठवणुक क्षमता | :------------------------------------------------ |
| ७) | आयकर (स्थायी क्रमांक ) (पॅन नंबर) | :------------------------------------------------ |
| ८) | विक्रीकर / बी एस टी /सि एस टी क्रमांक | :------------------------------------------------ |
| ९) | धान भरडाईचे प्रकार | :- कच्चा तांदुळ |
| १०) | अ) संमतीपत्रासोबत जोडलेले बयाणा रक्कमेचे | :- रक्कम रुपये ५०,०००/- |
| | ब) संमतीपत्र वेबसाईड वरुन घेतले असल्यास | :- रक्कम रुपये १,०००/- |
| | डी.डी. क्रमांक व तारीख व बँकेचे नांव | :- ------------------------------------------ |
| | | :- ------------------------------------------ |

मिलधारकाची सही व शिक्का

## महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक

------------------------------------------------------------------------------------------.

## हंगाम २००९-२०१० आधारभुत खरेदी धानाची भरडाई व धान / तांदुळ वाहतुक दर सम्मतीपत्र अटी व शर्ती

१) सन २००९-२०१० खरीप पणन हंगामात महामंडळामार्फत आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रात धानाची खरेदी सद्या जिल्हा ठाणे, चंदपूर,गोंदिया , नागपूर व गडचिरोली या जिल्हयामध्ये झाली असून तसेच नाशिक, नंदुरबार ,जळगाव व अमरावती या जिल्हयामध्ये सुध्दा धानाची खरेदी होवू शकेल. राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत केवळ कच्चा तांदुळ वितरीत होत असल्यामुळे उपरोक्त जिल्हयांमध्ये आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेल्या धानाची फक्त कच्चा तांदुळासाठी धानाची भरडाई करावयाची आहे. तेंव्हा उपरोक्त जिल्हयातील खरेदी झालेल्या धानाची भरडाई व धान / तांदुळ वाहतुक दरासाठी संमतीपत्रक अटी / शर्तीसह मागविण्यात येत असून संमतीपत्रक तथा अटी शर्ती प्रत्येक जिल्हयासाठी स्वतंत्र घेवून सादर करणे आवश्यक राहील.

२) मील मालकाने मिलींग करण्याचा क्षमतेचा तपशिल पुराव्यासह सादर करणे आवश्यक आहे.

३) मिल मालकाने यापूर्वी आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत भरडाईचे काम समाधानकारकरित्या केल्याचा संबंधीत प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ / विभागीय व्यवस्थापक, मार्केटींग फेडरेशन यांचेकडून मागील वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र सादर करावे.

४) मिल मालकाने मागील वर्षात भरडाईच्या कामाची केलेली आर्थिक उलाढाली बाबत सनदी लेखापाल (Charterd Accoutant ) यांचे वर्ष निहाय प्रमाणपत्र सादर करावे.

५) मिलधारकांना भरडाई काम वाटप करुन दिल्यानंतर कामाची प्रगती मंद आढळून आल्यास किंवा दिरंगाई दिसून आल्यास अथवा अन्यप्रकारे शासनाच्या होणा-या आर्थिक नुकसानीस मिलमालक जबाबदार राहतील.

६) शासनाने ठरवून दिलेल्या वाहतुकीचे व भरडाईचे दर अनुज्ञेय राहतील.

७) उतारा :- एक क्विंटल धानाच्या भरडाईतुन ६७% कच्चा तांदुळ द्यावा लागेल. राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत केवळ कच्चा तांदुळ वितरीत होत असल्यामुळे आधारभुत किंमत योजने अंतर्गत खरेदी केलेल्या धानाची शक्यतो कच्च्या तांदुळासाठी भरडाई करावी लागेल.

७अ) शासनाच्या वाहतुक खर्चातील बचतीबरोबरच भारतीय अन्न महामंडळाच्या अन्य राज्यातून कराव्या लागणा-या वाहतुक खर्चातही बचत व्हावी यासाठी या योजने अंतर्गत कच्चा तांदुळासाठी भरडाई केल्यावर यापासून तयार तांदुळ संबंधीत जिल्हाधिकारी भारतीय अन्न महामंडळाच्या मान्यतेने तात्काळ त्यात तालुक्यात / जिल्हयात सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत वितरीत करु शकतील व तसे करणे मिलर्सला बंधनकारक राहील.

८) **भरडाई दर** :- केंद्र शासनाकडून निश्चित करण्यात येणारे भरडाई दर सन २००९-२०१० या हंगामासाठी लागू राहतील.

९) **हाताळणुक** :- भरडाईतील खर्चात धान भरडाई मिल मधील धानाची उतराई हाताळणुक व भरडाई तसेच ५० कि. न्यु. बी.टीवल गोणी मध्ये दुहेरी शिलाईसह तांदुळ भरणे, तांदुळाची एफ सी आय च्या / किंवा शासकीय गोदामातील उतराई व वजन काटया पर्यंन्त गोणी नेणे या सर्व कामावरील खर्च मिलमालकास करणे बंधनकारक राहील व त्यासाठी कोणताही वेगळा खर्च मिलधारकास अनुज्ञेय असणार नाही.

१०) **सुरक्षितता** :- उचलेल्या धानाची वाहतुकी दरम्यानच्या किंवा मिल मधील सुरक्षिततेसाठी तसेच तांदुळाच्या शासकीय / एफ सी आय गोदामापर्यंतच्या वाहतुकी दरम्यानच्या सुरक्षिततेसाठी संबंधीत मिल मालक संपुर्णत: जबाबदार राहील त्यासाठी ते जरुर तर विमा उतरवतील. मात्र त्याचा खर्च शासन / महामंडळातर्फे दिला जाणार नाही.

११) **उपवस्तु** :- भरडाई दरम्यान मिळणारा ब्राण, भुसा इत्यादी सर्व उप उत्पादने मिल मालक घेईल त्यासाठी कोणतीही रक्कम त्यांचेकडून वसुल केली जाणार नाही.

१२) **पॉलीस** :-भरडाईस रबरी रोलरने ५% किंवा ७% पॉलीस अपेक्षीत राहील.

भारतीय अन्न महामंडळाच्या किंवा शासकीय गोदामात जमा करावयाचा तांदुळ हा ज्या दर्जाचे / वाणाचे धान दिले जाईल, त्याच दर्जाचा तांदुळ असणे मिलर्सला बंधनकारक राहील.

१३) अ) **धान भरडाई** :- या वर्षी खरेदी सुरु असतांनाच भरडाई सुरु करावयाची असल्याने धान भरडाईचे काम लवकरात लवकर व शक्यतो धान खरेदीच्या दिवसापासून एका महिण्यात अथवा उशिरात उशिरा सप्टेंबर, २०१० पुर्वी भरडाई पुर्ण करणे अपेक्षीत आहे. दिलेल्या मुदतीतच भरडाई पुर्ण करुन तांदुळ अन्न महामंडळाकडे जमा करणे बंधनकारक राहील.

१३) ब) **धान / तांदुळ डिलीव्हरी** :- महामंडळाने मिलमालकास डिलीव्हरी ऑर्डर दिल्यानंतर मिलरने १० दिवसात केंद्रावरुन / गोदामातुन धान प्रत्यक्ष उचलले पाहिजे व त्यानंतर १५ दिवसात भरडाई केलेला तांदुळ एफसीआयच्या / शासकीय गोदामात जमा केला पाहिजे. वरील मुदतीत धान उचलण्यास विलंब झाल्यास अशा मिलरकडून धानाची डि.ओ.दिल्यानंतर १० दिवसांनंतरच्या विलंबास प्रतिदिन प्रति क्विंटल ३० पैसे दंड आकारण्यात येईल. धानाची उचल केल्यानंतर १५ दिवसाच्या आत सीएमआर तांदुळ एफसीआय/शासकीय गोदामात जमा करणे बंधनकारक राहील. तांदुळ जमा करण्यास १५ दिवसानंतरच्या विलंबास मिलर्स जबाबदार असल्यास तांदुळाच्या किंमतीवर द.सा.द.शे. १५% दराने व्याजाची रक्कम वसुल केली जाईल व ही रक्कम मिलर्सला देय होणा-या भरडाई / वाहतुक खर्च प्रदानातुन एक रकमी वसुली केली जाईल. मात्र भारतीय अन्न महामंडळाने तांदुळ स्विकारण्यास लावलेल्या विलंबाकरीता कोणतीही नुकसान भरपाई मिलर्सना देय असणार नाही.

१४) भरडाईसाठी मंजुर मिल धारकास धान देते वेळी धानाच्या गोण्या प्रमाणीत असल्यास १०% गोण्यांची चाचणी वजन करुन देण्यात येईल. गोणी प्रमाणीत नसल्यास १००% धान वजन करुन देण्यात येईल. गोणी प्रमाणीत असतांनाही. मिलरला धान १००% वजन करुन हवे असल्यास ९०% तोलाईचा खर्च मिलरला दयावा लागेल. मात्र १०% गोण्याची चाचणी करुन देण्यासाठी होणारा तोलाईचा खर्च महामंडळाकडून केला जाईल. याव्यतिरिक्त इतर तोलाई खर्च मिलधारकास देय राहणार नाही.

१५) <u>एफ ए क्यु विनिर्देश</u> :- जमा करावयाचा कच्चा तांदुळ हा केंद्र शासनाने वर्ष २००९-२०१० साठी ठरविलेल्या सोबतच्या जोडपत्र १ मध्ये दर्शविलेल्या एफ ए क्यु विनिर्देशात बसणारा असला पाहिजे.

१६) **वाहतुक खर्च :-** खरेदी केंद्र / साठवणुक केंद्र ते धान भरडाई मिल दरम्यानची धान वाहतुक आणि धान भरडाई मिल ते भारतीय अन्न महामंडळ / शासकीय गोदाम या दरम्यानच्या तांदुळ वाहतुकीसाठी केंद्र शासन / भारतीय अन्न महामंडळ मंजुर / मान्य करतील ते टप्पेनिहाय वहातुकदर सन २००९-२०१० या खरीप पणन हंगामासाठी देय राहतील. तसेच **<u>यासंदर्भात शासनाकडून देण्यात येणा-या सविस्तर सुचना देखिल सर्व संबंधीतांना लागू राहतील.</u>**

१६) अ) सदर सर्व टप्पेनिहाय वहातुक दरामध्ये हमाली खर्चाचा समावेश असून मिल मालकास कोणत्याही स्तरावरुन धानाची चढाई / उतराई व अन्य कामासाठी वेगळा हमाली /हाताळणुक खर्च देय असणार नाही. या संदर्भात शासनाकडून ज्या काही सुचना प्राप्त होतील त्या सर्व सुचना सबंधितांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१६) ब) सदर टप्पेनिहाय वहातुक दर हे आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत धान खरेदी झालेल्या सर्व जिल्हयाकरीता लागू राहील.

१७) <u>बारदाना</u> :- धानासाठी नव्याने खरेदी करुन वापरलेला ५० किलो क्षमतेचा बारदाना शासनाचे सुचनांप्रमाणे महामंडळ तांदुळ जमा करण्यासाठी पुरवठा करेल. अ दर्जाचे तांदुळाचे गोणीवर इंग्रजीतील कॅपीटल लेटर A तर सर्वसाधारण ( Common) दर्जाचे तांदुळाचे गोणीवर C हे अक्षर मार्कींग मिलधारकास करावे लागेल. बारदानावर शासन पत्र क्र.खरेदी-१००८/१६८९/ प्र.क्र.४१२८/नापु-२९ दि.६ डिसेंबर, २००८ च्या पत्रान्वये शासनाने दिलेल्या निर्देशानुसार रंगाचे कलर कोडींग करावे लागेल व धान रिकामा झालेल्या बारदानापैकी उरलेला बारदाना संबंधीत प्रादेशिक व्यवस्थापक यांचेकडेस जमा करावा लागेल. शिल्लक बारदाना जमा करण्यास विलंब झाल्यास खरेदी किंमतीनुसार महामंडळाने ठरविलेल्या दराने वसुली करुन कपात करण्यात येईल.

१७) <u>इसारा रक्कम व अनामत रक्कम</u> :- भरडाईसाठी इच्छुक असलेल्या मिलमालकाकडून रुपये ५००००/- इसारा रक्कमा देणे बंधनकारक असून पात्र ठरलेल्या मंजुर मिलधारकास एकूण भरडाईसाठी मंजुर केलेल्या धानासाठी लागणारा भरडाई खर्च (+) धान भरडाईसाठी होणारा अंदाजित वाहतुक खर्च या दोहोच्या एकूण किंमतीच्या ५% अनामत रक्कम महामंडळाकडे राष्ट्रीयकृत बँकेच्या नांवे धनाकर्षाव्दारे जमा करणे बंधनकारक राहील.

१९) <u>बँक गॅरंटी / एफडीआर, टिडीआर :-</u> धान मिल मालकांना त्यांचे मिलींग क्षमतेनुसार आवश्यक तेवढया रक्कमेची परंतु किमान बॅन्क गॅरंटी राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँकेची एफ डी आर टीडीआर द्यावी लागेल ही बॅन्क गॅरंटी एफडीआर टिडीआर मिलरकडे कोणत्याही वेळी दिल्या जाणा-या एकूण धानाची किंमत व तांदुळाची किंमत वसुल करता येवू शकेल यारीतीने घेण्यात येईल. त्यावर व्याज मिळणार नाही. मिलच्या क्षमतेनुसार भरडाईचे काम देण्यात येईल. सदरची बँक गॅरंटी/ एफडीआर, टिडीआर ६ महिण्यासाठी दयावे लागेल व भरडाईच्या कामास विलंब झाल्यास बँक गॅरंटीची / एफडी आर, टिडीआरची मुदत पुढे वाढवून द्यावी लागेल.

२०) सुरक्षा अनामात व बँक गॅरंटी हया भरडाई व्यवहार पुर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल.

२१) <u>तांदुळ स्विकृतीचा आगावू कार्यक्रम</u> :- मंजुर मिलधारकास पुढील आठवडयाचे प्रत्येक तारखेस सीएमआर तांदुळाचे किती ट्रक्स भारतीय अन्न महामंडळाच्या प्रत्येक स्विकृती केंद्रावर पाठविणार याची आगावू माहिती ( गिरणी निहाय ॲडव्हान्स प्रोग्राम) अन्न महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापकांना देणे व त्यासाठी त्यांची त्वरीत मान्यता (Confirmation) घेणे बंधनकारक राहील व अशा मान्यतेने त्या त्या तारखेस ठरविल्यानुसार ट्रक पाठविणे राईस मिलरला क्रमप्राप्त राहील व या संदर्भात तारीख निहाय देवू केलेले ट्रक्स भारतीय अन्न महामंडळाने मान्यता दिलेले ट्रक्स प्रत्यक्षात पाठविलेले ट्रक्स, अन्न महामंडळाने स्विकारलेले ट्रक्स व शिल्लक ट्रक्स याची माहिती सुध्दा दर आठवडयास संबंधीत प्रादेशिक व्यवस्थापक / मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे देणेही बंधनकारक राहील.

याबाबत भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामपालाकडे तांदुळ हस्तांतरण करण्याच्या दिनांकासहीत निश्चित केलेला कार्यक्रमाप्रमाणे तांदुळ हस्तांतरणाची संपूर्ण जबाबदारी मिलधारकाची राहील. भारतीय अन्न महामंडळाकडे ट्रक्स खाली करण्यास विलंब होत असल्यास तसे मिल मालकाने संबंधीत प्रादेशिक व्यवस्थापक / जिल्हाधिकारी कार्यालयाकडे लेखी कळविणे आवश्यक राहील.

२२) <u>स्विकृती नोट ( **Acceptance Note** )</u> :- मिलरने एफ.सी.आय / शासकीय गोदामात तांदुळ जमा केल्याची पोहच (स्विकृती नोट ) वर्गीकरण प्रमाणपत्र (ॲनॉलिसीस रिपोर्ट ) वजन पटटी (वेट नोट ) लगेचच व उशिरात उशिरा दोन दिवसात महामंडळास संबंधीत प्रादेशिक कार्यालयास जमा करावे लागेल.

२३) <u>करारनामा</u> :- मिलरला भरडाईचे काम मिळाल्यावर तिन दिवसाचे आत रुपये १००/- चे स्टॅपवर अटी शर्तीसह करारनामा करुन द्यावा लागेल. मुदतीत करारनामा न केल्यास संमतीपत्र रद्य समजण्यात येईल.

२४) <u>नुकसान भरपाई</u> :- धानाचा / तांदुळाचा अपहार झाल्यास, भरडाईमध्ये तांदुळ I टक्केवारी पेक्षा कमी प्राप्त झाल्यास किंवा धानाची उचल भरडाई व तांदुळ जमा करण्यास विलंब झाल्यास त्याची नुकसान भरपाईची रक्कम पुर्णपणे मिलरला देय रक्कमेतुन वसुल करण्यात येईल.

२५) जिल्हानिहाय खरेदी केलेल्या धानाची भरडाई करतांना स्थानिक मिलर्सना प्राधान्य देण्यात येईल. मात्र स्थानिक मिलर्सकडून भरडाई करण्यास पुरेसा प्रयत्न करुनही प्रतिसाद न मिळाल्यास केवळ अपवादात्मक परिस्थितीतच अंतराचा विचार करुन नजिकच्या जिल्हयातील मिलर्सला सुध्दा भरडाईचे काम देण्याचा विचार करण्यात येईल.

२६) महामंडळाने मिलर निहाय ठरविलेले धान भरडाईचे प्रमाण हे सुचक ( Indective) असेल दिलेल्या आदेशानुसार भरडाईसाठी धान मिळण्याचा मिलरला हक्क असणार नाही. काही अपरिहार्य कारणाने भरडाई थांबवावी लागल्यास किंवा इतर मिलरला जादा काम दिल्यास मिल मालकास नुकसान भरपाई मागता येणार नाही.

२७) खरेदी केंद्र / साठवणुक केंद्र ते धान भरडाई मिल दरम्यानची धान वाहतुक आणि धान भरडाई मिल ते भारतीय अन्न महामंडळ / शासकीय गोदाम या दरम्यानच्या तांदुळ वाहतुक व प्रत्यक्ष धान भरडाई दरम्यान धानाच्या / तांदुळाचा अपहार झाल्यास किंवा धानाची उचल भरडाई व तांदुळ जमा करण्यास विलंब झाल्यास भरपाई वसुली अटी शर्ती / नियमानुसार मंजुर मिलमालकाकडून करण्यात येईल.

२८) <u>तुट</u> :- तांदुळ जमा करण्यात तुट आल्यास सी एम आर तांदुळाच्या ठरविलेल्या दरापेक्षा सव्वापट रक्कम मिलरकडून वसुल करण्यात येईल. उता-यातील तुट किंवा दर्जातील कमतरता यासाठी एफ सी आय ने काही रक्कम कमी केल्यास त्याची सुध्दा संपूर्ण भरपाई मिलर कडून करुन घेण्यात येईल.

२९) मिल मालकांनी महामंडळाचे काम वेळेवर न करुन दिल्यास तसेच मिलचे धान भरडाई कामकाज समाधानकारक न वाटल्यास तसेच धान भरडाईचे काम अत्यंत धिम्यागतीने करीत असल्याचे निदर्शनास आल्यास एक वेळा नोटीस देण्यात येईल. त्यावरही प्रगती न झाल्यास अशा मिलर्सशी केलेला करारनामा रद्द करण्यात येईल व कोणतेही कारण न देता महामंडळाचे धान कोठेही हलविता येईल व त्यापोटी मिल मालकास कोणतेही नुकसान भरपाई मागता येणार नाही.

३०)कोणत्याही कारणाने मिलमालकासोबत झालेल्या करारनामा रद्द करतांना जमा इसारा रक्कम व अनामत रक्कम जप्त करण्यात येवून ती शासनास जमा करण्यात येईल तसेच अशा मिलरकडे शिल्लक असलेल्या धानाची व तांदुळाची तुट वा साठा शिल्लक नसल्यास त्याची सव्वापट दराने होणारी रक्कम मिलर्सच्या जमा बँक गॅरंटीतुन परस्पर वसुल करुन शासन जमा करण्यात येईल.

३१) <u>भरडाई देयके</u> :- मिलरने भरडाई केलेला तांदुळ एफ सी आय / शासकीय गयोदामात जमा करुन देयके संबंधीत प्रादेशिक कार्यालयात त्वरीत सादर करणे बंधनकारक राहील. शासनाकडून देयके मंजुरीअंती रक्कम प्राप्त झालेवर संबंधीत प्रादेशिक व्यवस्थापक यांच्याकडे अशा प्राप्त रक्कमा वर्ग करुन मिलर्सला देयके अदायगीची कार्यवाही करण्यात येईल.

३२)सदर गिरणीत धानाची भरडाई सुरु असतांना काही घात, अपघात, नुकसान, जाळपोळ, जिवहानी व नैसर्गिक आपत्ती येवून नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मिल मालकावर राहील.

३३)<u>साठा तपासणी</u> :- मा. जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी किंवा पुरवठा यंत्रणेचे अधिकारी तसेच व्यवस्थापकीय संचालक यांनी प्राधिकृत करतील असे अधिकारी / कर्मचारी धान वाहतुक/ धान भरडाई संबंधी भेटी देतील तेंव्हा त्यांना संपूर्ण मागणी प्रमाणे रेकॉर्ड उपलब्ध करुन देणे व त्यास संपूर्ण सहकार्य करणे मिलर्सला बंधनकारक राहील.

३४) <u>आयकर</u> :- धान भरडाई / वाहतुक बिलातून आयकर कायदयानुसार कपात करुन देणे मिलर्सला बंधनकारक राहील.

३५) <u>जप्ती कार्यवाही</u> :- करारनाम्यानुसार भरडाईचे काम मिल मालकाने करुन दिले नाही तसेच मध्येच भरडाईचे काम सोडून दिले तर महामंडळाकडे जमा असलेला अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व बँक गॅरंटीनुसार नमुद केलेली रक्कम संबंधीत बँकेकडून महामंडळाकडे वर्ग करण्यात येईल.

३६)धानाची भरडाई वेळेच्या आत करुन तयार तांदुळ भारतीय अन्न महामंडळाकडे वेळच्यावेळी जमा करणे आवश्यक राहील. धान भरडाईतील उतारा, तांदुळाचा दर्जा विषयक विनिर्देश व भरडाईचा खर्च यात कोणतीही सुट मिळणार नाही.

३६ अ) केंद्र शासनाच्या सुचनेनुसार व विनिर्देशात बसणारा (F.A.Q.) दर्जा असलेला सीएमआर तांदुळ विहीत कालमर्यादित जे मिलर्स भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करणार नाहीत अशा गिरणीधारकांची नांवे काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

३७)विहीत मुदतीत भरडाईचे काम पूर्ण करण्यासाठी मिल मालकांची क्षमता, मागील अनुभव, कामाचे ट्रॅक , रेकॉर्ड, साठवणुक क्षमता, खरेदी केंद्रापासूनचे अंतर, अटी / शर्तीचे अधिन राहून काम करण्याची इच्छुकता / सहमती इत्यादी बाबींचा सर्वकश विचार करुन सक्षम मिलरला प्राधान्य देवून करारनामा करण्यात येईल.

३७ अ) खरीप पणन हंगाम २००९-१० करीता धान/तांदुळ वाहतुक धान भरडाई सबंधी संमतीपत्र महामंडळाकडे भरली नसल्यास अशा राईस मिलर्सला भरडाई सबंधीचे काम देता येणार नाही.

३८) <u>नाममात्र सभासद</u> :- मिल मालकास महामंडळाचे नाममात्र सभासद व्हावे लागेल त्यासाठी रुपये १०००/- एवढी फी भरण्यास मिल मालकास बंधनकारक राहील.

३९) कुठलीही कायदेशिर बाब उदभवल्यास नाशिक न्याय कक्षाअंतर्गत लागू राहील.

४०) एक किंवा सर्व प्राप्त संमतीपत्र कोणैतेही कारण न देता रद्य करण्याचे अंतिम अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी र ाखुन ठेवले आहे.

४१) धान भरडाई बाबत मिल मालक व महामंडळामध्ये वाद निर्माण झाल्यास प्रथमतः मा. व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे दाद मागता येईल. तदनंतर मा. आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांच्या लवादाकडे सदर वादा बाबत अंतिम निर्णयासाठी दाद मागता येईल. लवादाचा अंतिम निर्णय महामंडळ व मिलरला बंधनकारक राहील.

४२) भरडाई सुरळीत व्हावी याबाबत शासनाचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय विस्तार मुंबई यांचेकडील परीपत्रक क्रमांक धानभ १२०९/प्र.क्र..४२०३/ना.पु.२९ मंत्रालय विस्तार मुंबई ३२ दिनांक २९ ऑक्टोबर २००९ च्या सुचने नुसार सर्व अटी व शर्ती संमतीपत्रधारकास बंधनकारक राहतील. अथवा शासनाकडून भरडाई बाबत वेळोवेळी जे बदल केले जातील. त्या सर्व अटी व शर्ती संमतीपत्रधारकास बंधनकारक राहतील.
४३) कोणत्याही स्वरुपाची माहिती व कागदपत्रे जाणीवपुर्वक खोटी सादर केल्याचे निदर्शनास आल्यास अगर संमतीपत्र सशर्त (Conditional) असल्यास सदर संमतीपत्र नामंजुर करण्याचा अंतिम अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांनी राखुन ठेवला आहे.

वरील प्रमाणे अटी / शर्ती १ ते ४३ मला आम्हाला मान्य असून त्यास मी / आम्ही बंधनकारक आहोत.

श्री.मे /प्रो. . . . . . . . . . . . . . . . . . .
(भरडाई मिलचे नांव व संपूर्ण पत्ता शिक्का व सही )

दिनांक / /२००९

जोडपत्र-१ (केवळ कच्चा तांदुळासाठी)

UNIFORM SPECIFICATION FOR GRADE A & COMMON RICE
(Marletomg season 2009-2010)

Rice shall be in sound merchantable condition sweet dry ;clean ;wholesom of good food value uniform in colour and size of grains and free from moulds weevils ;obnoxious smell admixture of unwholesome poisonous substances Agremone maxicana and Lathyrus sativus (kesari) In any form or colouring agents and all impurities except to the extent in the schedule below it shall also conform to PFA Standerds.

**SCHEDULE OF SPECIFICATION**

| Sr No | Refractons | Maximum Limit (%) | |
|---|---|---|---|
| | | Gtade "A" | Common |
| 01 | Broken *<br>Raw | 25.0 | 25.0 |
| 02 | Fofreign Matter **<br>Raw | 0.5 | 0.5 |
| 03 | Damaged # /Slightly Damaged grains<br>Raw | 3.0 # | 3.0 # |
| 04 | Discoloured Grains<br>Raw | 3.0 | 3.0 |
| 05 | Chalky Grains<br>Raw | 5.0 | 5.0 |
| 06 | Red Grains<br>Raw | 3.0 | 3.0 |
| 07 | Admixture of lower class<br>Raw | 6.0 | -- |
| 08 | Dehusked Grains<br>Raw | 12.0 | 12.0 |
| 09 | Moisture content @<br>Raw | 14.0 | 14.0 |

**Note-** **<u>AS PER SYMBOLINDICATION</u>**

***** Including 1% small brokens

****** Not more than 0.25% by Weight shall be mineral matter and not more than 0.10% by weight shall be impurities of animal origin.

**#** Rice having incidence of pin point damage to be extent of 1% over and above 3% Damaged/Slightly Damaged grains may be accepted without any value kcut.

**@** Rice (both raw and parboiled) can be procured with moisture content upto a maximum limit of 15% with value cut. There will be no value cutup to 14% between 14% 15% moisture. Value cut will be applicable at the rate of full value.